अस्सल सोलापुरी

# सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. १४ जून २०२४ । वर्ष : २२ वे | अंक : २५५ वा | किंमत : ५ रुपये | पाने १२

## मुंबई-पुण्यात ईडीचे छापे; कोट्यवधींची मालमत्ता जप्त

**पुणे** : ईडीने फेअर प्ले प्रकरणी १२ जून रोजी मुंबई आणि पुण्यातील १९ ठिकाणी छापे टाकले आहेत. फेअर प्ले पने आयपीएल क्रिकेट सामन्याचे बेकायदेशीरपणे प्रसारण केल्याचा आरोप आहे. तसेच नुकत्याच झालेल्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या दरम्यान या पचा बेटींगसाठी वापर केल्याचे आढळून आले असल्यानं ईडीनं ही कारवाई केली. झडतीदरम्यान ईडीने,बँक फंड, डीमॅट खातंसह लक्झरी घड्याळ अशी एकूण ८ कोटीची मालमत्ता जप्त केली आहे, अशी माहिती ईडीच्या मुंबई विभागीय कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

या प्रकरणात चौकशी आणि तपास सुरु असल्याची माहिती ईडीकडन देण्यात आली आहे. वायकॉम १८ मीडिया प्रायवेट लिमिटेडनं नोडल सायबर पोलीस, मुंबई यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. आयपीसी १८६०, माहित तंत्रज्ञान कायदा,२००० आणि कॉपीराईट कायदा १९५७ नुसार फेअर प्ले स्पोर्ट एलएलसी आणि इतरांविरोधात १०० कोटी रुपयांच्या नुकसान प्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली होती. या तक्रारीवरुन ईडीनं कारवाई केली आहे. दरम्यान, फेअर प्ले प्रकरणात ईडीकडून अधिक चौकशी आणि तपास सुरु असल्याचं सांगण्यात आलं आहे.

# फरार आरोपींना पकडण्यास गेलेल्या पोलिसांवर दगडफेक

**• माळशिरस तालुक्यातील सवतगाव येथे पोलीस आणि आरोपींच्या नातेवाईकांमध्ये झटापट**

- डोळ्यात चटणी टाकून दगडाने मारहाण
- एका अधिकाऱ्यासह चार पोलीस जखमी
- ३ महिलांसह ५ जणांविरुद्ध गुन्हा

सुराज्य/अकलूज

**हल्ली राज्यभरात पोलिसांवर हल्ले वाढत चालले आहेत. सार्वजनिक ठिकाणी नियम दाखवल्यास किंवा किंवा आरोपींना पकडण्यासाठी गेल्यानंतर पोलिसांना धक्काबुक्की करून मारहाण करण्याचे प्रकार आपण सर्रासपणे पहात असतो. आरोपींना अटक करायला गेलेल्या पोलिसांच्या डोळ्यात तिखट टाकून त्यांच्यावर दगडफेक करण्याचा प्रयत्न माळशिरस तालुक्यातील सवतगाव येथे घडला. यात एका पोलीस अधिकाऱ्यासह चौघे पोलीस जखमी झाले आहेत. याप्रकारणी ३ महिलांसह ५ जणांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, दाखल गुन्ह्यातील आरोपीला पकडण्यासाठी पोलीस सवतगावला गेले होते. त्यावेळी आरोपीच्या सग्यासोयऱ्यांनी स्थानिक गुन्हे शाखा आणि अकलूज पोलिसांच्या डोळ्यात तिखट टाकून दगडफेक केली. या दगडफेकीत पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचारी जखमी झाले. ही घटना सवतगाव (ता.माळशिरस) पारधी वसाहत येथे बुधवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात अकलूजच्या पोलिसांनी ३ महिलांसह ५ जणांविरुद्ध शासकिय कामात अडथळा आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला असून सर्व आरोपी घटनेनंतर प्रसार झाले आहेत.

यासंदर्भात शिवाजी जाधव या हेड कॉन्स्टेबलने अकलूज पोलिसात फिर्याद दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी पारूबाई अशोक पवार, नानी महावीर काळे, त्याची मुलगी, दाद्या आणि अशोक जलद्या पवार (सर्व रा. सवतगाव ता.माळशिरस) अशा ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

बुधवारी दुपारच्या सुमारास अकलूज पोलीस ठाण्यातील शिवाजी जाधव आणि पोलीस शिपाई गायकवाड असे दोघे सवतगाव येथे आरोपींचा शोध घेण्यासाठी दुचाकीवरून गेले होते. त्यांच्या पाठोपाठ स्थानिक गुन्हे शाखेचे वाहन घटनास्थळी हजर झाले. पोलिसांचे पथक पारधी वस्तीतील संशयित आरोपींचा शोध घेत होते. त्यावेळी त्यांना सुभाष राजू चव्हाण हा गुन्हेगार मिळून आला.

पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन वाहनाजवळ नेत असताना वरील आरोपींनी पोलिसांसमोर गराडा टाकून तुम्ही सुभाष याला घेऊन जाऊ नका. त्याला सोडून द्या, असे म्हणून आरोपीला पकडून आपल्याकडे ओढू लागले. पोलिसांनी त्यांना न जुमानता सुभाष याला सरकारी वाहनात बसवले. तेंव्हा वरील सर्व आरोपींनी त्यांच्या वाहनावर दगडफेक केली. आणि पोलिसांच्या तोंडावर तिखट टाकली. त्यात सहाय्यक निरिक्षक खुने, फौजदार कांबळे, महिला शिपाई बाबर, अडगळे आदी कर्मचारी जखमी झाले. दगडफेकीत पोलिसांच्या वाहनाचे ६ ते ७ हजारांचे नुकसान झाले, अशी नोंद पोलीस पोलिसात झाली. सहाय्यक निरिक्षक चौधरी पुढील तपास करीत आहेत.

# सुनेत्रा पवारांची मागच्या दाराने संसदेत एन्ट्री

## दुधाची तहान ताकावर भागवण्याची अजितदादा गटावर नामुष्की

**मुंबई** : राजकारणी लोकांना सत्ता आणि पदे हवी असतात. लोकांनी जरी नाकारले तरी राजकारण्यांसाठी लोकशाही मंदिरांची मागची दारे देखील सताड उघडीच असतात. अपयश आल्यानंतर राजकारणी मंडळी थेट मागच्या दारातून या मंदिरांमध्ये घुसत असतात.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या सुनबाई, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची गुरूवारी राज्यसभेवर खासदार म्हणून बिनविरोध निवड झाली. बारामती लोकसभा मतदार संघातून पराभव झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी मागच्या दाराने संसदेत एन्ट्री करून आपली राजकिय महत्वाकांक्षा पूर्ण करून घेतली. त्यांची ही निवड म्हणजे दुधाची तहान ताकावर भागवण्याचा बाका प्रसंग अजितदादा गटावर ओढवला आहे.सुनेत्रा पवारांचा पराभव अजितदादांच्या जिव्हारी लागला होता. बारामती लोकसभा मतदारसंघातून शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार या नणंद- भावजयमध्ये लढत झाली होती. सुनेत्रा पवार विधानसभेत जाऊन उमेदवारी अर्ज दाखल केला. विरोधात एकही अर्ज आलेला नाही. त्यामुळे त्यांची अविरोध निवड झाली.



### एकाच घरात किती पदे?

लोकसभा निवडणुकीमध्ये अवघ्या काही दिवसांपूर्वीच पराभवाला सामोरे गेल्यानंतरही सुनेत्रा पवार यांची मागच्या दाराने संसदेमध्ये एन्ट्री झाली आहे. त्यांच्या रूपाने बारामतीला तिसरा खासदार मिळाला. लोकसभेला सुप्रिया सुळे यांनी सुनेत्रा पवार यांचा बारामती लोकसभेला मोठा पराभव करत खासदारकीची हॅट्रिक केली आहे. दुसरीकडे शरद पवार हे सुद्धा राज्यसभेवर खासदार आहेत. एकाच घराण्यात तीन खासदार, दोन आमदार आहेत. त्यामुळे एकाच घरात किती पदे असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### पवार फॅमिलीचाच बोलबाला

एकट्या बारामतीमधून आता तीन खासदार झाले आहेत. त्यामुळे संसदेमध्ये बारामतीची ताकद चांगलीच निर्माण झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासूनच बारामतीचे वर्चस्व राज्याच्या राजकारणात राहिले आहे. राष्ट्रवादीचे दोन शकले झाली आहेत. अजित पवार आणि शरद पवार यांच्यात राष्ट्रवादीमध्ये दोन तुकडे झाले आहेत. मात्र, या दोन्ही गटांमधून पवार फॅमिलीचाच बोलबाला आहे. बारामतीमधून तीन खासदार आणि दोन आमदार सुद्धा याच पवार कुटुंबातून आहेत.

### अजून एकजण एन्ट्रीस सज्ज

अजित पवार स्वतः बारामती विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. त्यांचे पुतणे रोहित पवार कर्जत विधानसभेचे प्रतिनिधित्व करत आहेत. एकाचवेळी बारामती पवार कुटुंबातून तीन खासदार आणि दोन आमदार आहेत. पवार फॅमिलीतील संघर्षामध्ये अजित पवारांचे पुतणे युगेंद्र पवार यांनी सुद्धा उडी मारली आहे. आता आगामी विधानसभा निवडणुकीला त्यांनाच उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी युगेंद्र पवारांच्या समर्थकांनी शरद पवारांकडे केली आहे.

## मंडल अधिकाऱ्याला लाच घेताना पकडले

सुराज्य/मंगळवेढा

पाच हजारांची लाच घेणारा मंडलाधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकला. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया मंगळवेढा पोलीस ठाण्यात सुरू आहे. चंद्रकांत इंगोले, मंडल अधिकारी मारापूर, तालुका मंगळवेढा असे या महसूल अधिकाऱ्याचे नाव आहे.

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, तक्रारदार यांनी जमीन बक्षीस पत्र करून सात-बारा उताऱ्यावर नाव नोंदणी करण्यासाठी तहसील कार्यालयाकडे अर्ज केला होता. तेव्हा मंडल अधिकारी इंगोले यांनी तक्रारदाराकडे सात हजार रुपये लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती पाच हजार रुपये देण्याचे ठरले. पाच हजार रुपये देताना संत दामाजी साखर कारखाना रोडवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक यांच्या पथकाने इंगोले यांना रंगेहात पकडले.

## • अकलूजमध्ये भीषण अपघात

# कार झाडावर आदळून दोघे तरूण जागीच ठार

सुराज्य/अकलूज



अकलूज ता. माळशिरस येथे कार वरील नियंत्रण सुटून झालेल्या अपघातात राहुल कोळेकर व समाधान सरतापे हे दोघे तरूण जागीच ठार झाले तर अन्य दोघेजण जखमी झाले.हा अपघात बुधवारी मध्यरात्री घडला.

याबाबत अकलूज पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, अकलूज येथील नवीन स्टॅन्ड परिसरातील महर्षि चौकातून जयसिंह चौकाकडे शुभम बाळू चव्हाण (वय २३), यश नवनाथ शिंदे (वय २०) दोघे रा. वेळापूर, राहुल बापूसाहेब कोळेकर (वय २४) रा. उघडेवाडी व समाधान बुवा सरतापे (वय २३) रा. खुडुस ता. माळशिरस हे चौघे मित्र रात्री साडे अकराच्या सुमारास कारमधून निघाले होते. त्यावेळी त्यांची (निसान टेरेनो गाडी क्र. एमएच ४५ एन ०००८ ) ही गाडी प्रचंड वेगात होती. वेगावर नियंत्रण न ठेवता आल्याने गाडीवरील ताबा सुटला आणि ही गाडी रस्त्यालगत असणाऱ्या दोन झाडांना धडकली. रस्त्याच्या कडेला लावण्यात आलेल्या मैलाच्या दगडाला धडकून गाडी उलट्या दिशेला फिरली. ही धडक एवढी जबरदस्त होती की, मधल्या सीटवर बसलेल्या राहुल कोळेकर याच्या डोक्याचा अर्धा भाग तुटून रस्त्यावर पडला होता. तर समाधान सरतापेच्याही डोक्याला मार लागल्याने त्यांचा जागेवरच मृत्यू झाला. शुभम चव्हाण व यश शिंदे हे किरकोळ जखमी झाल्याने त्यांना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. जखमी व्यक्ती उपचारासाठी दवाखान्यात असल्याने गाडी नक्की कोण चालवत होते, हे अद्याप समजू शकले नाही. ही तरूण मुले दारूच्या नशेत गाडी चालवत होती की नशा न करता गाडी वेगात चालवल्याने हा अपघात झाला हे तपासात लवकरच समजून येईल.



राहुल कोळेकर



समाधान सरतापे

**अन्य दोघेजण जखमी**

### स्पीड ब्रेकरला रंगाचे पट्टे का नाहीत

महर्षि चौक ते गिरझणी चौकामध्ये रस्ता क्रॉस करण्यासाठी कोठेही जागा नसल्याने या परिसरातील सर्व वाहने विरुद्ध दिशेने महर्षि चौकाकडे येतात. महर्षि चौक ते गिरझणी चौक या दोन चौकाच्या मध्ये औदुंबरनगर ही वसाहत आहे. या वसाहतीमध्ये अनेक दवाखाने, मेडीकल, मॉल व व्यावसायीक दुकाने आहेत. जर हा अपघात दिवसा झाला असता आणि विरुद्ध दिशेने वाहतुक सुरू असती तर निश्चितच मयतांचा आकडा वाढला असता. या रोडवरती असणाऱ्या स्पीड ब्रेकरवरती रंगाचे पट्टे मारले नसल्याने ते ही दिसून येत नाहीत.

## सांगेला तालुक्यातील अप्रुका नदीच्या पुरात तरुण वाहून गेला

सुराज्य/सांगोला



सांगोला तालुक्यातील अप्रुका नदीला आलेल्या पुरातील पाण्यात आलेगावचा एक तरुण वाहून गेल्याचा संशय आहे. गेल्या दोन दिवसांपासून शोध घेऊनही तो सापडला नाही.

तानाजी भगवान दिवसे हा ३७ वर्षीय तरुण घराकडे परतलाच नाही. त्यामुळे तो पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याच्या संशयावरून नातेवाईकांनी गेले दोन दिवस त्याचा अप्रुका नदीच्या पाण्यात शोध घेऊनही तो सापडला नाही. याबाबत, तानाजीची आई धोंडाबाई भगवान दिवसे (रा. आलेगाव) यांनी पोलिसात मुलगा हरविल्याबाबत तक्रार दिली आहे. आलेगाव (दिवसेवस्ती, ता. सांगोला) येथील तानाजी भगवान दिवसे हा ३७ वर्षीय तरुण बुधवारी रात्री ९ च्या सुमारास आलेगाव ते दिवसेवस्ती घराकडे निघाला होता. दरम्यान त्यादिवशी मृगाच्या मुसळधार पावसामुळे दिवसे वस्तीकडे जाणाऱ्या रोडवरील अप्रुका नदीला पाणी आल्यामुळे गावातील लोकांनी त्याला नदीला पाणी आले आहे. तू पाण्यातून जाण्याचे धाडस करू नकोस म्हणून ग्रामस्थांनी रोखले होते तरीही तो अंधारात तसाच पाण्यातून पुढे निघाला होता. मात्र, दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत तो घराकडे परतलाच नाही. त्यामुळे नातेवाईकांनी त्याची चौकशी सुरू केली असता ग्रामस्थांनी रात्री घडला प्रकार सांगितल्याने तो पाण्यात वाहून गेला की काय असा संशय व्यक्त केला. दरम्यान, नातेवाईकांनी गेले दोन दिवस अप्रुका नदी पात्राच्या दुतर्फा तानाजीचा शोध घेतला असता तो मिळून आला नाही.

आक्रोशाने उळे-कासेगाव शोकमग्न : पान १२ वर

## डॉ. संजीव ठाकूर पुन्हा डीनपदी रुजू

**सोलापूर** : पुण्यातील ससून रुग्णालयात अधिष्ठाता पदावरील वादग्रस्त कारकिर्दीनंतर डॉ. संजीव ठाकूर आता पुन्हा एकदा सोलापूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये डीनपदी रुजू झाले आहेत. यासंदर्भातील आदेशाचे पत्र राज्याचे उपसचिव अजित सासुलकर यांनी काढले आहेत. ससूनमध्ये असताना अमली पदार्थ संबंधित आरोपीला मदत केल्याचे प्रकरण पुढे आले होते. या प्रकरणामुळे डॉ. ठाकूर अडचणीत आले होते. डॉ. वैशंपायन स्मृती शासकिय वैद्यकिय महाविद्यालय सोलापूर येथील अधिष्ठाता पदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ. सदानंद भिसे प्राध्यापक न्यायवैद्यकशास्त्र शासकिय वैद्यकिय महाविद्यालय परभणी यांच्याकडे सोपविण्यात आला होता. बी.जे. शासकिय वैद्यकिय महाविद्यालय (ससून) पुणे येथील अधिष्ठाता पदाचा कार्यभार डॉ. संजीव ठाकूर यांच्याकडून काढून घेण्यात आला होता.



## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे





छत्री घेऊन जा!

कल्याण
116-82-228
मुंबई
230-51-335

# गरीब लेकीच्या डॉक्टरकीसाठी माणुसकी धावून आली...

सुराज्य/सोलापूर

**आजच्या परिस्थितीत डॉक्टर अथवा इंजिनियर होणे हे गरिबांचे काम नाहीच नाही.अतिउच्च शिक्षणाची कवाडे केवळ श्रीमंत लोकांसाठी उघडी असतात. आजकाल उच्च शिक्षणाला भरपूर पैसा लागतो. बाबा. शिक्षण गरिबाचे राहिले नाही, मेडिकलसाठी लाखो, कोटी रुपये लागतात,अशी सर्वसामान्यांमधली ही चर्चा आपल्या कानावर नेहमीच पडत असते पण या जगात माणुसकी व मानवता आहे,हे सोलापुरातील एका आदर्शावरून सांगता येईल.**

## • एमआयएमकडून अल्फिया पठाण हिला ५० हजारांची मदत

वैद्यकिय प्रवेशाच्या परीक्षेत सोलापुरातल्या संजय गांधी झोपडपट्टी परिसरात राहणाऱ्या अल्फिया पठाण या विद्यार्थीनीने घवघवीत यश प्राप्त केले. अल्फिया हिने नीट परीक्षेत ७२० पैकी ६१७ गुण मिळवले. विशेष म्हणजे यासाठी तिने कोणतेही क्लासेस किंवा ट्युशन न लावता यशाला गवसणी घातली. अल्फीयाने अतिशय प्रतिकूल परिस्थितीत मिळवलेल्या या यशाचे सर्वच स्तरावरून कौतुक होत आहे. तर, तिच्या पाठीवर कौतुकाची थाप देताना आर्थिक मदत देऊनही तिचा सर्वत्र सन्मान केला जात आहे.

वैद्यकिय प्रवेशासाठी ज्यांची ऐपत आहे, तेच तयारी करतात हे वास्तव आहे. मात्र काही विद्यार्थी हे आपल्या गुणवत्ता आणि बुद्धीमत्तेच्या जोरावर हा समज मोडून काढतात. ते विद्यार्थी लाखो गरिबांच्या कुटुंबात प्रेरणाज्योत बनून पुढे येतात. सोलापूरच्या झोपडपट्टीत राहणारी अल्फीयाचे यश असेच रहस्यमय आणि प्रेरणादायी आहे. अल्पसंख्यांक समाजात उच्च शिक्षणाचे प्रमाण हे कमी आहे. त्यात नशिबी आलेली गरिबी मुलांच्या शिक्षणात अडथळा ठरू नये, यासाठी वडिल मुस्तफा आणि समीना पठाण यांनी केलेले कष्ट नक्कीच कौतुकास्पद आहेत. यावेळी जुबेर शेख,जुबेर सय्यद, इलियास शेख, नासिर मंगलगीरी, एजाज बागवान, राजा बागवान, नदीम डोंनगावकर, मोहसिन मैंदर्गीकर, शोहेब चौधरी मुजम्मील वड्डो आदी उपस्थित होते.





### ५० हजारांची मदत

विविध संस्था, संघटनानी अल्फीयाच्या यशाची प्रशंसा केली. सोलापुराच्या एमआयएमच्या पदाधिकाऱ्यांनी देखील अल्फीयाच्या यशाचे कौतुक करत तिचा सन्मान केला. शहराध्यक्ष फारुक शाब्दी यांनी अल्फीयाच्या घरी जाऊन ५० हजार रुपयांची आर्थिक मदत केली. मुस्लिम समाजातील मुलींनी उच्च शिक्षण घ्यावे, त्यासाठी समाजातर्फे आणि एमआयएम तर्फे सर्वतोपरी मदत करण्यासाठी कटिबद्ध असल्याचा शब्दही यावेळी एमआयएम नेते फारूक शाब्दी यांनी दिला.